## -: प्रेसनोट दिनांक - १०/०३/२०२६ :-

**आरोपी लोकसेवक विलास शामराव साळोखे, वय- ५५ वर्षे, अक्षीक्षक, इस्टेट ऑफीसर, इस्टेट विभाग, अतिरिक्त कार्यभार अतिक्रमण विभाग, कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर वर्ग - ३ रा. , रा. रि.स.नं.११५४/२/१ प्लॉट नं.५९, आनंद इंग्लीश मिडीयम स्कुल, संत सेना महाराज नगर,फुलेवाडी कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत...**

---

तक्रारदार हे कटलरीचा व्यवसाय करतात. तसेच ते दरवर्षी रंगपंचमी वेळी कोल्हापूर महानगरपालीकेजवळ बाजारगेट येथे पिवडी व रंगपंचमीचे फुगे यांचा स्टॉल लावुन विक्री करीत असतात. चालु वर्षी पिवडी रंगपंचमीचे फुगे असे विकत आणुन ते किरकोळ दरामध्ये विक्री करण्याकरीता कोल्हापूर महानगरपालीकेच्या बाजुला असलेल्या बाजारगेट जवळ रस्त्याचे कडेला स्टॉल लावलेला होता. दरम्यान कोल्हापूर महानगरपालीकेच्या अतिक्रमण विभागाचे प्रमुख विलास साळोखे हे माझे स्टॉलवर आले व त्यांनी रस्त्यावर स्टॉल लावुन अतिक्रमण कराय लागलास काय असे म्हणुन मला कारवाईची भिती घातली त्यावेळी मी विनंती केलेवर मला अतिक्रमण विभागाचे प्रमुख विलास साळोखे यांनी कारवाई न करण्याकरीता १५००/- रूपये द्यावे लागतील असे म्हणुन माझेकडे १५००/- रूपये लाचेची मागणी केली, म्हणुन तक्रारदार यांनी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये तक्रारदार यांचेकडे अतिक्रमण विभाग प्रमुख विलास साळोखे यांनी पैशासंदर्भात निरोप दिल्याप्रमाणे आल्याचे नमुद करून तक्रारदार यांच्याकडे पडताळणीपुर्वी १५००/- रूपये लाचेची मागणी केली होती त्यामध्ये तक्रारदार मुल्ला यांनी काहीतरी कमी करा असे म्हणाले असता साळोखे यांनी त्यांचे हाताची दोन बोटे तक्रारदार यांचेसमोर धरून एवढे करा असे म्हणुन तक्रारदार यांच्याकडे बेकायदेशिरपणे २०००/-रू लाचेची मागणी करून लाच रक्कम लगेच घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता, पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन **आरोपी** लोकसेवक विलास शामराव साळोखे, वय- ५५ वर्षे, अक्षीक्षक, इस्टेट ऑफीसर, इस्टेट विभाग, अतिरिक्त कार्यभार अतिक्रमण विभाग, कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर यांनी २,०००/- रूपये लाच स्विकारलेने, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी **आरोपी लोकसेवक विलास शामराव साळोखे, वय- ५५ वर्षे, अक्षीक्षक, इस्टेट ऑफीसर, इस्टेट विभाग, अतिरिक्त कार्यभार अतिक्रमण विभाग, कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर वर्ग - ३ रा. , रा. रि.स.नं.११५४/२/१ प्लॉट नं.५९, आनंद इंग्लीश मिडीयम स्कुल, संत सेना महाराज नगर,फुलेवाडी कोल्हापूर** यांचेविरूध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार, तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली उज्वला भडकमकर, पोलीस निरीक्षक, प्रकाश भंडारे, स.पो.फौ. पो.हे.कॉ. विकास माने, पो.हे.कॉ. सुधिर पाटील, पो.कॉ.संदिप पवार, चा.पो.कॉ.प्रशांत दावणे, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४.